हरि:ॐ
Astro • Puja • Vastu

|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

## वेदव्रतचतुष्टय

१०. महानाम्नीव्रत ११. महाव्रत १२. उपनिषद् १३. गोदानव्रत

अशा नांवांचे चार प्रकारचे संस्कार आहेत. ती चार व्रतें क्रमें करून जन्मापासून तेराव्या इत्यादिक वर्षांचें ठिकाणीं उत्तरायणांत चौलसंस्काराला उक्त जी तिथि, नक्षत्रे, वार यांचें ठायीं करावीं. उपनयन झाल्यानंतर ब्रह्मचर्यांत बरेच नियम पाळून विद्या संपादन करावयाची असतें. सांग वेदाध्ययन केलें पाहिजे. निदान शाखाध्ययन तरी केले पाहिजे. संहिता, ब्राह्मण व आरण्यके मिळून ग्रंथास शाखा असें म्हणतात. शाखेचे तरी अध्ययन करावयास पाहिजे. त्यांत आरण्यके म्हणतेवेळीं चवथ्या आरण्यकाचा आरंभ' विदामघवन्विदा' येथपासून आहे. तेवढ्या एका खंडास महानाम्नी अशी संज्ञा आहे. तसेंच प्रथमारण्यकाच्या आरंभीं' अथातः संहिताया उपनिषत्' अशी प्रतीकें (मूळ ग्रंथांतील शब्द) आहेत. म्हणून तीं तीं आरण्यके म्हणण्याचा अधिकार उत्पन्न होण्यासाठीं अगोदर जो विधि केला जातो त्या विधीस' महानाम्नीव्रत, महाव्रत, उपनिषद्व्रत.' असे म्हणतात याप्रमाणें तीन वर्षांत अध्ययन संपलें म्हणजे गुरूला त्या आरण्यकाच्या अध्ययनाबद्दल एक गाय व एक बैल दक्षिणा द्यावयाची असते. गाय देण्याच्या या विधीला 'गोदानव्रत' असे म्हणतात. अध्ययनाचे टप्पे म्हणून असलेंले हे संस्कार प्रयश्चित्तावर येऊन बसल्यामुळे प्रत्येक व्रताबद्दल १. एक एक कृच्छ्र अथवा गायत्रीच्या शंभर आहुति द्याव्यांत किंवा २. तीन पासून बाराकृच्छ्रे इच्छेनुसार प्रायश्चित्त करावें. त्यांपैकीं दुसऱ्या प्रकारचे प्रायश्चित्त समावर्तनापूर्वी करतात. ह्या व्रतांचें विस्तृत प्रयोग संस्कारकौस्तुभ इत्यादि ग्रंथांमध्ये व आपआपल्या गृह्यसूत्रांत पहावे.

HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA
योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

SANPADA OFFICE
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

GOVANDI OFFICE
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com